# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांक:23.04.2026** **वार: गुरुवार**

---

1. तामिळनाडूतल्या सर्व, तर पश्चिम बंगालमधल्या पहिल्या टप्प्यातील विधानसभा मतदारसंघांमध्ये मतदानाला सुरुवात
2. सरकारकडून ऑनलाइन गेमिंगसाठीची नियमावली जाहीर; येत्या एक मे पासून लागू होणार
3. चारधामपैकी बद्रीनाथ धामचे दरवाजे भाविकांसाठी खुले आणि
4. होर्मुझच्या सामुद्रधुनीच्या भागातील तणाव वाढला

**पश्चिम बंगाल-निवडणूक**

पश्चिम बंगाल विधानसभा निवडणुकीसाठी आज पहिल्या टप्प्यातलं मतदान होत आहे. या टप्प्यात, 16 जिल्हातल्या 152 मतदारसंघांमध्ये मतदानाला सुरुवात झाली असून एकंदर 1 हजार 478 उमेदवार रिंगणात आहेत. मतदानासाठी 44 हजारांहून अधिक मतदान केंद्रांची उभारणी करण्यात आली आहे. या पैकी, 7 हजार 384 मतदान केंद्रं, 'अति संवेदनशील' म्हणून घोषित करण्यात आली आहेत. आजच्या टप्प्यात, अंदाजे 3 कोटींहून अधिक मतदार मतदानाचा हक्क बजावतील अशी अपेक्षा आहे. मतदान सुरळीत पार पडावं यासाठी, केंद्रीय सशस्त्र दलाच्या 2 हजार 407 तुकड्या तैनात करण्यात आल्या आहेत. तसंच, सर्व मतदान केंद्रांवर 'जलद प्रतिसाद पथकं' देखील तैनात करण्यात आली आहेत.

**तामिळनाडू-निवडणूक**

तामिळनाडू विधानसभेच्या सर्व जागांसाठी आज, एकाच टप्प्यात मतदान होत आहे. सकाळी 7 वाजल्यापासून मतदानाला सुरुवात झाली आहे. राज्यातील, मतदार याद्यांच्या विशेष आणि सखोल पुनरीक्षणानंतर होत असलेली ही पहिलीच विधानसभा निवडणूक आहे. या निवडणुकीसाठी, 234 मतदारसंघांत मिळून, एकंदर 4 हजार 23 उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात आहेत. मतदानाच्या काळात कायदा आणि सुव्यवस्था सुनिश्चित करण्यासाठी, केंद्रीय सशस्त्र दलाच्या 31 तुकड्या तैनात करण्यात आल्या आहेत. याशिवाय राज्य पोलिस दलाचे 23 हजार कर्मचारी तैनात करण्यात आले आहेत. सर्व मतदान केंद्रांवर वेबकास्टिंग केलं जाणार असल्याची माहिती केंद्रीय निवडणूक आयोगानं दिली आहे. महाराष्ट्रातल्या बारामती आणि राहुरी या दोन विधानसभा मतदारसंघांच्या पोटनिवडणुकीसाठीही मतदानाला सुरुवात झाली आहे.

**खर्गे-नोटीस**

काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याविषयी आक्षेपार्ह टिप्पणी करून आदर्श आचारसंहितेच्या नियमांचं उल्लंघन केल्याबद्दल निवडणूक आयोगानं खर्गे यांना कारणे दाखवा नोटीस बजावली आहे. खर्गे यांनी चेन्नई इथल्या पत्रकार परिषदेत ही आक्षेपार्ह शेरेबाजी केली होती. या वक्तव्याबद्दल खर्गे यांना 24 तासांच्या आत आपली भूमिका स्पष्ट करण्यास आयोगानं सांगितलं आहे. भारतीय जनता पक्षाचे ज्येष्ठ नेते आणि केंद्रीय मंत्री किरेन रिजिजू यांच्यासह पक्षाच्या इतर पदाधिकाऱ्यांनी केलेल्या तक्रारीवरून निवडणूक आयोगानं ही नोटीस बजावली आहे.

**ऑनलाइन गेमिंग नियमन**

केंद्र सरकारने काल, 'ऑनलाइन गेमिंग प्रोत्साहन आणि नियमन 2026' ची नियमावली प्रसिद्ध केली. येत्या 1 मे पासून हे नियम लागू होतील. ऑनलाइन गेमिंगचं नियमन करणं, नागरिकांची सुरक्षा सुनिश्चित करणं, आर्थिक व्यवस्था सुरक्षित ठेवणं आणि वापरकर्त्यांच्या हक्कांचे संरक्षण करण्याच्या उद्देशानं ही नियमावली जारी करण्यात आली आहे. यासाठी 6 सदस्यांचं प्राधिकारण स्थापन करण्यात आलं आहे. इलेक्ट्रॉनिक्स आणि माहिती तंत्रज्ञान मंत्रालयाचे अतिरिक्त सचिव, प्राधिकरणाच्या अध्यक्षस्थानी असतील, अशी माहिती मंत्रालयाचे सचिव एस. कृष्णन यांनी काल प्रसार मध्यमांशी बोलताना दिली.

**बद्रीनाथ कपाट**

उत्तराखंडच्या चमोली जिल्ह्यात असलेल्या बद्रीनाथ धाम या प्रसिद्ध तीर्थस्थानाचे दरवाजे आज सकाळी सव्वा सहा वाजता भाविकांसाठी उघडण्यात आले. जय बद्री विशालच्या जयघोषात, अत्यंत भक्तिमय वातावरणात दरवाजे उघडल्यानंतर मुख्यमंत्री पुष्करसिंह धामी यांच्या हस्ते महाभिषेक पूजा झाली. भाविकांची तीर्थयात्रा सुरक्षितपणे पार पडावी यासाठी जिल्हा प्रशासनानं चोख व्यवस्था केली आहे. तत्पूर्वी चार धाम यात्रेतील केदारनाथ धामचे दरवाजे काल भाविकांसाठी उघडण्यात आले, दरम्यान गंगोत्री आणि यमुनोत्री इथली यात्रा सुरळितपणे सुरू आहे.

**बुद्धअवशेष**

तथागत भगवान गौतमबुद्धांचे पवित्र अवशेष दर्शनासाठी लडाख या केंद्रशासित प्रदेशात नेण्यात येणार आहेत. हे पवित्र अवशेष त्यांच्या कायमस्वरुपी स्थानाहून दर्शनासाठी देशात अन्यत्र नेण्याची ही पहिलीच वेळ असणार आहे. केंद्रीय संस्कृती मंत्री गजेंद्रसिंह शेखावत आणि लडाखचे नायब राज्यपाल विनयकुमार सक्सेना यांच्या उपस्थितीत नवी दिल्लीमध्ये झालेल्या पत्रकार परिषदेत ही घोषणा करण्यात आली. पुढील महिन्याच्या 1 तारखेपासून पुढील पंधरा दिवस हे अवशेष दर्शनासाठी ठेवले जातील. झेड दर्जाच्या सुरक्षा व्यवस्थेसह विशेष विमानातून हे अवशेष लडाखला नेले जाणार आहेत.

**पश्चिम आशिया परिस्थिती**

इराणच्या नौदलानं नाकेबंदी अधिक तीव्र केल्यानं मागील काही तासांत होर्मुझच्या सामुद्रधुनीतील तणावाची परिस्थिती अधिकच चिघळली असून या भागात आणि आसपास नवीन घटना घडल्याचंही वृत्त आहे. इराणच्या इस्लामिक रिव्होल्यूशनरी गार्ड कॉर्प्सने प्रतिबंधित सागरी क्षेत्र म्हणून घोषित करण्यात आलेल्या भागात सुव्यवस्था आणि सुरक्षिततेला बाधा निर्माण केल्याबद्दल दोन कंटेनर जहाजं जप्त केल्याचं म्हटलं आहे. ओमानच्या किनाऱ्याजवळ तिसऱ्या जहाजावर गोळीबार करण्यात आला, त्यामुळे त्याच्या ब्रिजचं मोठ्या प्रमाणात नुकसान झालं, मात्र यामध्ये कुठली जीवितहानी झाल्याचं खात्रीलायक रीत्या समजू शकलं नाही, असं सागरी देखरेख संस्थांकडून सांगण्यात आलं आहे.

दरम्यान इराणसोबतचा दोन आठवड्यांचा युद्धविराम संपला असला तरी, सध्या आपल्या नौदलाने घेतलेला पवित्रा कायम राहील, असे व्हाईट हाऊसनं संकेत दिले आहेत. व्यापक करार होईपर्यंत दबाव कायम राहील असं सांगतानाच अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी इराणसोबतच्या सकारात्मक मध्यस्थीच्या प्रयत्नांमुळे पुढील 72 तासांत चर्चा होऊ शकते, असंही त्यांनी सूचित केलं. इराणचे अध्यक्ष मसूद पेझेश्कियन यांनी समाज माध्यमावरील पोस्टद्वारे यावर प्रतिक्रिया व्यक्त करताना, वचनभंग, नाकेबंदी आणि धमक्या हे खऱ्या वाटाघाटींमधील मुख्य अडथळे असल्याचं म्हटलं आहे. दरम्यान अमेरिकेच्या नौदलाचे प्रमुख जॉन सी फेलन यांना तत्काळ या पदावरून पायउतार करण्यात येत असल्याचं अमेरिकेच्या युद्ध विभागानं जाहीर केलं आहे. त्यांच्या जागी हंग काओ यांची प्रभारी नौदल प्रमुख म्हणून नियुक्ती करण्यात येत असल्याचंही पेंटॅगॉननं म्हटलं आहे.

**लुफ्तान्सा**

इराण युद्धामुळे तेलाच्या किंमतीत वाढ होत असल्यानं काही देशांमध्ये जेट इंधनांचा तुटवडा जाणवण्याची शक्यता असल्यानं आपली कमी अंतराची 20 हजार उड्डाणं येत्या ऑक्टोबरपर्यंत रद्द करणार असल्याचं लुफ्तान्सा एअरलाइन्ससह इतर युरोपियन विमान कंपन्यांची मालकी असलेल्या जर्मन विमान कंपनीने सांगितलं आहे. फ्रँकफर्ट आणि म्युनिक या मुख्य केंद्रावरून चालवण्यात येणारी कमी नफ्याच्या मार्गावरील उड्डाणं रद्द केल्यानं जवळपास 40 हजार मेट्रिक टन जेट इंधनाची बचत होणार असल्याचं लुफ्तान्सा समुहानं म्हटलं आहे. खर्चात कपात करण्यासाठी कंपनीनं गेल्या आठवड्यात आपली सिटीलाइन ही प्रादेशिक उपकंपनी बंद केली होती.

**पत्रकार ठार**

दक्षिण लेबेनॉनवर इस्रायलनं केलेल्या हवाई हल्ल्यात एका लेबानीज पत्रकाराचा मृत्यू झाला असून या हल्ल्यानंतर काही तासांनी त्याचा मृतदेह ढिगाऱ्याखालून बाहेर काढण्यात आला. अमल खलील असं या पत्रकाराचं नाव आहे. इस्रायल आणि हिजबुला यांच्यात ऑक्टोबर 2023 मध्ये संघर्ष सुरू झाल्यापासून तो अल-अखबार वृत्तपत्रासाठी या युद्धाचं वारतांकन करत होता.

**भारत वस्त्रोद्योग**

जागतिक बाजारपेठेत भारताच्या वस्त्रोद्योग क्षेत्राची स्थिती मजबूत राहिली असून आर्थिक वर्ष 26 मध्ये हातमागासह कापड निर्यातीत आदल्या वर्षीपेक्षा 2 पूर्णांक 1 दशांश टक्क्यांनी वाढ होऊन ती 3 लाख 16 हजार 334 कोटी रुपयांच्या वर पोहोचली. एका

सरकारी निवेदनात ही माहिती देण्यात आली आहे. तयार कपड्यांचा या निर्यातीत सर्वाधिक वाटा असून त्याच्या निर्यातीत 2 पूर्णांक 9 दशांश टक्क्यांनी वाढ झाली आहे.

**भारतीय चीझ**

ब्राझीलमध्ये दरवर्षी भरवण्यात येणाऱ्या केइजो दो ब्राझील या चीझ तसंच दुग्धजन्य उत्पादनांच्या स्पर्धेत प्रथमच पदार्पण करत भारतात तयार झालेल्या जीझनं जागतिक पातळीवर आपला ठसा उमटवला आहे, अशी माहिती पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी समाज माध्यमावरील संदेशाद्वारे दिली आहे. या स्पर्धेत चार भारतीय उत्पादनांनी पदकांची कमाई केली. त्यामध्ये एक सुपर गोल्ड, दोन सुवर्ण आणि एका रौप्य पदकाचा समावेश आहे.

**जितेंद्र सिंह-इशारा**

केंद्रीय मंत्री डॉ. जितेंद्र सिंह यांनी आहारासंबंधी चुकीच्या आणि दिशाभूल करणाऱ्या माहितीपासून सावध राहण्याचं आवाहन केलं असून, पोषणाबाबत आपला वैयक्तिक दृष्टिकोन अंगिकारण्याची गरज स्पष्ट केली आहे. नवी दिल्लीत एका आहारविषयक पुस्तकाच्या प्रकाशनप्रसंगी डॉ. सिंह बोलत होते. आहाराला सर्वसाधारण सूचना किंवा एकसमान तक्त्यांपुरतं मर्यादित ठेवता येऊ शकणार नाही असं सांगून प्रत्येक व्यक्तीनं आपल्या शरीराच्या, जीवनशैलीच्या आणि चयापचयाच्या गरजेनुसार आपला आहार कसा असावा हे समजून घेऊन त्यात बदल केला पाहिजे, असंही जितेंद्र सिंह यांनी सांगितलं.

**क्रिकेट-महिला**

दक्षिण आफ्रिकेतील जोहानेसबर्ग इथं काल झालेल्या, दक्षिण आफ्रिका आणि भारतीय महिला टी-20 क्रिकेट सामन्यात, दक्षिण आफ्रिकेने भारतीय संघाचा 9 गडी राखून पराभव केला. भारतीय संघाने प्रथम फलंदाजी करत, यजमान संघासमोर 193 धावांचं लक्ष्य ठेवलं होतं, ते, दक्षिण आफ्रिका संघाने 16 षटकं, 3 चेंडूत, केवळ एक गडी गमावून साध्य केलं. पाच सामन्यांच्या या मालिकेत भारतीय संघाने अद्याप एकही सामना जिंकला नसून, संघ, 0-3 असा पिछाडीवर आहे.

# याबरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं.

# नमस्कार.